पनवेल(प्रतिनिधी) ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या जीवनात अनेक चढ-उतार पाहिले असून त्यांना त्यांच्या जीवनात आलेल्या अनुभवामुळे व मार्गदर्शनामुळे नव्या पिढीला योग्य दिशा देण्याचे काम होत असते, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नविन पनवेल येथे केले. श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल शहर कॉंग्रेस कमिटी अंतर्गत प्रभाग कमांक ०३ च्या वतीने नविन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व छत्री वाटप कार्यकम पार पडला. या कार्यकमात एक हजारहून ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार झाला. त्याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आम्ही राजकारणात असलो तरी समाजकारणाला प्रथम प्राधान्य देतो. निवडणुकांचा हेतू समोर ठेवून आम्ही कोणतेही कार्य करत नसुन पनवेल परिसरात २००७ सालापासूनच सर्व विभागात जावून ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, सन्मान करत आहोत. गोरगरीब जनतेसाठी महाआरोग्य शिबीरांचे आयोजन करीत आहोत.समाजात वावरत असताना सामाजिक कार्य करणे हे आम्ही आमचे आद्यकर्तव्य मानून करीत असून ज्येष्ठ नागरिकांचा आशिर्वादाचा हात यापुढेही असाच कायम असावा, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

यावेळी कार्यकमाच्या आयोजिका व नविन पनवेल कॉंग्रेसच्या महिला अध्यक्षा सुशिला घरत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत वहया, गणवेश, आर्थिक मदत तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार आणि छत्री वाटप कार्यकम दरवर्षी मोठया प्रमाणात आणि उत्साहात साजरा केला जातो.लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्व देत असतात म्हणुनच त्यांच्याकडून नेहमी विधायक कार्य घडत असून त्यांच्याकडून जनसेवेचे काम अखंडपणे होत आहे, असेही सुशिला घरत म्हणाल्या. पनवेलचे आमदार झाल्यानंतर प्रशांतदादांनी फक्त साडेचार वर्षात शेकडो कोटी रूपयांची विकासकामे केली आहेत व काही प्रगतीपथावर आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, अल्पसंख्यांक समजातील विद्यार्थीनीकरिता वस्तीगृह, उपजिल्हा रूग्णालय, भुयारी गटारे, उडडाणपूल, रस्ते, समाजमंदिरे, व्यायामशाळा अशा अनेक विकासकामांची गंगा पनवेलमध्ये आणली. त्यांनी केलेले काम हे पनवेल विधानसभा मतदार संघातील नागरिक कधीच विसणार नाही त्याचबरोबर त्यांनी केलेल्या कामाची पावती आगामी निवडणुकीत देवून प्रशांतदादांना पुन्हा आमदार म्हणून निवडुन आणतील, असा ठाम विश्वासही सुशिला घरत यांनी यावेळी व्यक्त केला.

या सोहळयास नगराध्यक्षा चारूशिला घरत, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी, तालुका कॉंग्रेसच्या कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, सपना पाटील, प्रभाग ०३ चे अध्यक्ष के.डी.म्हात्रे, कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, प्रभाग ०३ व १० चे विभागीय कार्याध्यक्ष रविंद्र भगत, बाळाराम गायकवाड, शैलेश पाटील, सचिन पाटील, जगदिश घरत, विठठल शार्दुल, जयश्री यादव, कल्पना ठकेकर, अनिता ठाकूर आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.